**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक ०३ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **ओबीसी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती नेमण्याचा राज्य सरकारचा निर्णय / अनुसूचित जमातीतल्या इयत्ता नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करणार.**
2. **नक्षलींचा बीमोड होईपर्यंत सरकार स्वस्थ बसणार नाही असा केंद्रीय गृहमंत्र्यांचा इशारा.**
3. **११२ वर्षांनंतर भंडारा नगर परिषद क्षेत्रातील १६ हजार ४०० कुटूंबाचा सिटी सर्व्हे करण्यात येणार.**
4. **एकलव्य एकल विद्यालय शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण वर्गाचे उद्या उद्घाटन, आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांची उपस्थिती.**

---------------------------------------------

मंत्रिमंडळाची उपसमिती

ओबीसी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती नेमण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. आज सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाल्याचं मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितलं. महायुतीतल्या तिन्ही पक्षांच्या प्रत्येकी दोन मंत्र्यांचा या समितीत समावेश असेल, अशी माहिती त्यांनी दिली. राज्यात अनुसूचित जमातीतल्या इयत्ता नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेऐवजी केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करण्याला मंत्रिमंडळानं आजच्या बैठकीत मंजुरी दिली. संजय गांधी निराधार योजना तसंच श्रावणबाळ योजनेतल्या दिव्यांगांच्या अर्थसहाय्यात १ हजार रुपयांची वाढ करण्यात आली. असून लाभार्थ्यांना आता दरमहा दीड हजाराऐवजी अडीच हजार रुपये मिळणार आहेत. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मौजा गोधणी (रिठी) आणि मौजा लाडगांव (रिठी), तालुका हिंगणा जि. नागपूर येथील एकूण अंदाजे क्षेत्र ६९२.०६ हेक्टर जागा संपादित करून सार्वजनिक हितार्थ "नविन नागपूर" अंतर्गत "International Business and Finance Centre (IBFC)" विकसीत करण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यास

तत्वत मान्यता देण्यात आली आहे. याशिवाय नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नागपूर शहराभोवती बाहय वळण रस्ता (Outer Ring Road) व त्यालगत ४ वाहतूक बेट (Truck & Bus Terminal) विकसित करणार असल्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

-------------------------------------------

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

हैदराबाद गॅझिटियर लागू करण्याचा निर्णय हा कायद्याच्या चौकटीत घेतला असून कुणबी प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया सुलभ होणार असल्याचं, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत वार्ताहरांना सांगितलं. यामुळे ओबीसी प्रवर्गाचं नुकसान होणार नाही. जे ओबीसी नेते नाराज आहेत त्यांच्याशी मुख्यमंत्री आणि आपण चर्चा करू, वस्तुस्थिती समजल्यानंतर त्यांची नाराजी दूर होईल, असं शिंदे म्हणाले.

-------------------------------------------

केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव

१२ हजार ५०० आरोग्य मंदिरांच्या स्थापनेमुळे आरोग्यसेवा ही ओपीडी पुरती सीमित न राहता प्रतिबंधात्मक उपचाराची सोयही झाल्याचं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आयोजित आयुष अभियानाच्या विभागीय परिषदेला ते संबोधित करत होते. २३ सप्टेंबरला साजऱ्या होणाऱ्या आयुर्वेद दिवसाची संकल्पना जनता आणि जगासाठी आयुर्वेद अशी आहे. या अभियानात सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांनी सहभागी व्हावं आणि आयुर्वेदाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवावा असं आवाहन जाधव यांनी केलं -

***(होल्ड बाईट - केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव 25 सेकंद)***

***आयुर्वेद फॉर पिपल एंड प्लॅनेट थीम के साथ आयुर्वेद दिवस की दसवीं वर्षगाँठ मनाने जा रहे है। यह थीम इकोलॉजिकल बैलेंस एवंम सस्टेनेबिलिटी सुनिश्चित करते हुए इंडिविजुअल हेल्थ को बढ़ावा देने में, आयुर्वेद की रिलेवन्स पर प्रकाश डालती है। मैं सभी राज्यों, संघ, राज्य क्षेत्रों से आग्रह करता हूँ कि वे इसमें सक्रिय रूप से भाग ले।***

-------------------------------------------

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

नक्षलींचा बीमोड होईपर्यंत सरकार स्वस्थ बसणार नाही असा इशारा देत ३१ मार्च २०२६ पर्यंत नक्षली चळवळ संपुष्टात येईल, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. छत्तीसगडमध्ये नक्षलीं विरोधातलं, ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट यशस्वीरीत्या

राबवणाऱ्या, सीआरपीएफ, छत्तीसगड पोलीस आणि कमांडोंचं शहा यांनी अभिनंदन केलं, त्यावेळी ते बोलत होते. परिस्थिती प्रतिकूल असतानाही सुरक्षा दलांनी नक्षलींचे तळ उद्ध्वस्त केले, नक्षलविरोधी अभियानात जवानांनी दाखवलेलं शौर्य इतिहासाच्या पानांवर सुवर्ण अक्षरात लिहिलं जाईल, असे गौरवोद्गार शहा यांनी काढले. या मोहिमेत गंभीर जखमी झालेल्या जवांना सरकार सर्वोतोपरी मदत करेल, असं आश्वासन शहा यांनी दिलं. या मोहिमेत सुरक्षा दलांच्या कारवाईत ३१ नक्षली ठार झाले. २१ एप्रिल ते ३१ मे दरम्यान ही मोहीम राबवली गेली.

-----------------------------------------

जीएसटी बैठक

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर परिषदेची ५६वी बैठक नवी दिल्ली इथे सुरू आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन बैठकीच्या अध्यक्षस्थानी आहेत. केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी तसंच अनेक राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे अर्थमंत्री या बैठकीत सहभागी होत आहेत. करांचं सुसूत्रीकरण आणि कर विवरणपत्र भरण्याच्या प्रक्रियेचं सुलभीकरण, यासह नव्या जीएसटी सुधारणांबाबत या बैठकीत चर्चा अपेक्षित आहे. याबाबतची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात केली होती. जीएसटीचे फक्त ५ टक्के आणि १८ टक्के हे दोनच स्लॅब ठेऊन, १२ आणि २८ टक्क्याचे स्लॅब काढून टाकण्याचा निर्णय या बैठकीत होण्याची शक्यता आहे.

-----------------------------------------

सिटी सर्व्हे

पहिल्यांदाच ११२ वर्षानंतर भंडारा नगर परिषद क्षेत्रातील १६ हजार ४०० कुटूंबाचा सिटी सर्व्हे करण्यात येणार आहे. नगरपरिषद क्षेत्रांत अखेरचा सर्व्हे १९१२ मध्ये झाला होता. त्यामुळे अनेक वर्षानी हा सर्व्हे होण्याच्या दिशेने मोठ पाऊल उचलण्यात आले आहे. आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी भंडारा नगरपरिषदेच्या आढावा बैठकीत सिटी सर्व्हे तातडीने सुरु करण्याचे निर्देश मुख्याधिकाऱ्यांनी दिले. यासाठी अंदाजित खर्च तीन कोटी ४० लाख रुपये असला तरी नगरपरिषदेच्या निधीतून अनेक वर्षांपासून नझूलच्या जागेवर अतिक्रमण करणाऱ्यांचा मार्ग मोकळा होणार आहे. तत्काळ एक कोटी रुपये दिले असून, उरलेला निधी वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून भरण्यासाठी प्रस्ताव सादर केला जाणार आहे. या सर्व्हेत पिंगलाई येथील ३,२००, गणेशपूरचे ५,०००, केसलवाडाचे १,२०० आणि भंडारा शहरातील ७ हजार घरांचे सर्वे करण्यात येणार आहे. अनेक वर्षांपासून नझुलच्या जागेवर बसलेल्या परिवारांना

मालकी हक्क मिळण्याचा आणि घरकुल योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग प्रशस्त होईल.

-------------------------------------------

गणेशोत्सव मंडळ स्पर्धा

राज्य उत्सवांतर्गत आयोजित महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचा या वर्षापासून तालुकास्तरापर्यंत विस्तार करण्यात आला आहे. त्यामुळे यंदा जिल्हा तसंच राज्यस्तरांसोबतच तालुकास्तरीय पारितोषिकंही देण्यात येणार आहेत. राज्यभरातल्या ४०४ मंडळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला असून, या सर्वांच्या सादरीकरणाचं परीक्षण सुरू आहे.

-------------------------------------------

विसर्जन व्यवस्था

श्री गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधांना गणेशभक्तांचा चांगला प्रतिसाद मिळत आहेत. शहरात विविध ठिकाणी तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावासह फिरत्या विसर्जन वाहनात पाच दिवसांपर्यंत 6 हजार 261 श्री गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यात आले आहे. तर नऊ दिवसीय आणि दहा दिवसीय श्री गणेश मूर्तीचे विसर्जनाच्या दृष्टीने महानगरपालिकेची यंत्रणा सज्ज झाली आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत श्रीगणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी शहरातील 216 ठिकाणी 419 कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे. शहरातील फुटाळा तलाव, शुक्रवारी तलाव, सक्करदरा तलाव आणि सोनेगाव तलाव, येथे गणपती विसर्जनाला पूर्णपणे बंदी आहे. याशिवाय कोराडी तलाव, गोरेवाडा, पोलिस लाईन टाकळी येथे मोठ्या गणपती मूर्तींच्या विसर्जनाची सोय करण्यात आली आहे. विविध ठिकाणी गणपती विसर्जनाकरिता गणेशभक्त मोठ्या संख्येने येत असून, त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी 1065 मनपाचे कर्मचारी कार्यरत आहेत.

-------------------------------------------

शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण

लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेतर्फे दरवर्षी नागपुरात एकलव्य एकल विद्यालय शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण आयोजित केले जातात. यावर्षी 4 ते 7 सप्टेंबर 2025 दरम्यान रेशीम बाग येथील महर्षी व्यास सभागृह हे वर्ग होणार आहेत. या शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन गुरुवार 4 सप्टेंबर रोजी संध्याकाळी 6.30

वाजता राज्याचे आदिवासी विकास मंत्री  अशोक उईके यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेचे अध्यक्ष अतुल शिरोडकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील. दरवर्षी शैक्षणिक सत्राच्या प्रारंभी सर्व विद्यालयांच्या अध्यापक आणि पर्यवेक्षकांसाठी चार दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे संस्थेतर्फे नागपुरात आयोजन केले जाते. यावर्षीच्या या प्रशिक्षण वर्गामध्ये एकूण 1185 संस्थांमधून 1185 शिक्षक, 148 प्रवासी कार्यकर्ते, 33180  विद्यार्थी आणि आठ हजार 295 ग्राम शिक्षा समिती सदस्य सहभागी होत आहेत.

---------------------------------------------

हवामान

नागपूरसह विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये आज आणि उद्या विजांच्या कडकडाटासह वादळ आणि मुसळधार ते अति मुसळधार  पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्याने वर्तवली आहे. आज  अमरावती जिल्ह्यात पावसाचा ऑरेंज अलेर्त देण्यात आला आहे.

---------------------------------------------